वर्ष ४३ अंक ७

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the web

www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

जुलै २०२३
आषाढ/अधिक श्रावण
शके १९४५


## अध्यक्षीय

नमस्कार मित्रांनो,



उत्तर अमेरिकेमध्ये मराठी समाजाची मोठ्या प्रमाणात वसाहत होत आहे. ती आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या कशी समृद्ध राहील यासाठीचे प्रयत्न म्हणजे बीएमएम २.० संकल्प!

गेल्या दहा महिन्यात या संकल्प पूर्तीसाठी नवीन प्रकल्पांची निर्मिती, त्यांचे व्यवस्थापन, त्यासाठी लागणाऱ्या कार्यकर्त्यांच्या निवडीची पद्धत, मंडळांचा सहभाग व विकास यावर जोमाने काम चालू आहे. यातून जी एक नवीन यंत्रणा निर्माण होत आहे ती काही सामाजिक तत्त्वांवर आधारित व घटनेच्या नियमांनी बांधलेली आहे. आज मी त्यावर दोन शब्द बोलणार आहे.

बीएमएमच्या घटनेनुसार सदस्य मंडळ कार्यकारिणीच्या काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत - बीएमएमने आखलेले कार्यक्रम प्राधान्याने मंडळात आयोजित करणे, बीएमएम राबवित असलेल्या संकल्पात आपल्या सभासदांना भाग घेण्यासाठी प्रवृत करणे व बीएमएम डिरेक्टरीसाठी आपल्या सभासदांची माहिती पुरवणे.

तसेच बीएमएमच्या घटनेनुसार मंडळाच्या बीएमएम प्रतिनिधीसाठी काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत - बीएमएम वृत्ताचा खप वाढवणे, बीएमएमच्या प्रकल्पांचे मार्केटिंग करणे, बीएमएम अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये हातभार लावणे व बीएमएमच्या कामामध्ये आपले मत मांडणे.

बीएमएम प्रतिनिधी हे बीएमएम संस्थेचे अधिकृत भाग आहेत. ते कसे असावेत यासाठीचे नियम बीएमएमचे आहेत.  त्यानुसार प्रत्येक मंडळ आपला बीएमएम प्रतिनिधी दोन वर्षासाठी अधिवेशन ते अधिवेशन अशा कालावधी साठी नियुक्त करते. ही नियुक्ती अधिवेशनाच्या वर्षी एक जानेवारीपासून 31 मार्च पर्यंत करण्याची तरतूद आपल्या घटनेमध्ये आहे. त्या व्यतिरिक्त जर काही बदल करायचे असतील तर त्यासाठी योग्य कारणे नक्कीच पाहिजेत. त्यामुळे बीएमएमचे काही नुकसान तर होणार नाही ना हे बघणं सुद्धा खूप महत्त्वाचे आहे. आणि ती जबाबदारी बीएमएमची आहे. बीएमएम २.० चे सर्व निर्णय सर्व मंडळांना समान संधी, पारदर्शकता, fair/योग्य व just/न्याय या तत्त्वांवर / पॉलिसी वर आधारित आहेत.

कार्यकर्त्यांच्या नियुक्तीमध्ये आपण एक अशीच पारदर्शक पद्धत आखलेली आहे. त्यातून सर्व मंडळातून असे १५० हून अधिक कार्यकर्ते आज आपल्या अनेक प्रकल्पांवर काम करत आहेत. कार्यकर्त्यांहून अधिक जबाबदारी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची आहे.

कुठल्याही नवीन प्रकल्पाच्या कल्पनेला पाठिंबा द्यायचा. ज्याची कल्पना आहे त्याने पुढे येऊन नेतृत्व करायचे, मात्र हे टीम वर्क पाहिजे. त्याला/तिला मदतीसाठी योग्य कार्यकर्ते मिळवून देणे, टेक्नॉलॉजी, ईमेल इत्यादी मदत व गव्हर्नन्स हे बीएमएमचे काम. आपल्या उत्तर अमेरिकेतील सामाजिक गरजा अशाच पद्धतीने यशस्वीरित्या पूर्ण होतील असा आमचा, बीएमएम २.० संकल्पनेचा विश्वास आहे.

या वृत्तामध्ये मला अशाच एक प्रकल्पाबद्दल प्रामुख्याने नमूद करायला आवडेल तो म्हणजे बीएमएम फिल्म क्लब! उत्तर अमेरिकेमध्ये फिल्म निर्माण करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या गोष्टी निर्माण करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. देऊळ या चित्रपटाचे निर्माते अभी घोलप यांच्या नेतृत्वाखाली हा प्रकल्प आपण राबवत आहोत.

१५ जुलैला वाशिंग्टन डीसी येथे व २२-२३ जुलैला सियाटल येथे बृहन महाराष्ट्र मंडळाचे मैत्री मेळावे भरत आहेत. तुम्ही सगळ्यांनी नक्की यायचं आहे बर का!

नेहमीप्रमाणे सांख्य:कारिकेच्या एका श्लोकाने थांबतो:

**सान्तःकरणा बुद्धीः सर्वं विषयमवगाहते यस्मात ।**
**तस्मात्त्रिविधमं करणं द्वारि द्वाराणि शेषाणि ॥**

अर्थ: अंतःकरण (बुद्धी, अहंकार व मन) या घराची दारे ज्ञानेंद्रिये (डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा) आहेत. त्यातून येणारे सर्व विषय बुद्धी, अहंकार व मन यांच्या मदतीने समजून घेते.

शुभेच्छा,


**संदीप दीक्षित** (अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४)
+1 216-926-6696 |sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/bmmpresident bmmonline.org bmmapp.org

#bmm2 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

## बृहन्महाराष्ट्र वृत्त
**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**

संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर


अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
इमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330
Email: Rajan.Pednekar@bmmonline.org


**वर्गणीचे दर**:- $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription
**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


### बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष: | संदीप दीक्षित | क्लिव्हलँड, ओहायो |
| सचिव: | अजित नातू | सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया |
| कोषाध्यक्ष: | राजन पेडणेकर | टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| सदस्य: | अमर उन्हेकर, | लिविंग्स्टन, न्यु जर्सी |
| | सविता मोरे | वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक | वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर | ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत | सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष : | मोहित चिटणीस, | सिएॅटल, वॉशिंग्टन |
| सदस्य: | नितीन जोशी, | शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, | रिजफील्ड, कनेटिकट |

प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक मंडळ | २ |
| बृ. म. मंडळ अधिवेशन, बे एरिया – २०२४ वार्ता | ३ |
| बृ. म. मंडळ उपक्रम | ४ |
| बृ. म. मंडळ उपक्रम | ५ |
| बृ. म. मंडळ उपक्रम | ६ |
| सावलीचं झाड / MBM टोरांटो कॅनडा | ७ |
| लेख: शिवाजी पार्कची फेरी - २०२३ | ८ |
| ब्राह्मण सभा, मुंबई / उंच माझी झेप! | ९ |
| जाहिरात | १० |
| जाहिरात | ११ |


## संपादक मंडळ

वृत्त संपादनाची धुरा नवीन संपादक मंडळाने हाती घेतली आहे. नवीन संपादक मंडळाची घडी बसेपर्यंत वृत्तच्या अंकात काही बदल दिसतील. तुमच्या सूचना इमेलद्वारे जरूर कळवा.

**संपादक मंडळातील सदस्य**

| | |
|---|---|
| अपर्णा कोळेकर | कोमल कुलकर्णी |
| नीता धोपेश्वरकर | शुभदा सावरगावकर |
| विदुला कोल्हटकर | शीतल रांगणेकर |
| अनिता कांत | राजन पेडणेकर |

## बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रादेशिक मराठी मैत्री मेळावा’

**१५ जुलै २०२३ वॉशिंग्टन डी. सी.**
बाल्टिमोर मराठी मंडळ (बीएमएम), ग्रेटर रिचमंड मराठी मंडळ (जीआरएमएम) आणि महाराष्ट्र मंडळ सेंट्रल पी. ए. यांच्या साथीने मराठी कला मंडळ वॉशिंग्टन डी. सी. आयोजित
बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रादेशिक मैत्री मेळावा २०२३
https://www.marathi.com/mkm-maitri-melawa/

**२२ आणि २३ जुलै २०२३ सिॲटल्**
सिॲटल् महाराष्ट्र मंडळ ओरेगॉन मराठी मंडळ आणि मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया या दोन मंडळांबरोबर साजरा करणार आहे सिॲटल् महाराष्ट्र मंडळ आयोजित
बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रादेशिक मैत्री मेळावा २०२३
https://www.seattlemm.org/events/bmm-प्रादेशिक-मराठी-मैत्री-म/

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४ – वार्ता


**अधिवेशन केंद्राची भेट**: अधिवेशनाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि विविध समितींच्या स्वयंसेवकांनी २ जून, २०२३ रोजी सॅन होजे अधिवेशन केंद्राची पाहणी केली, तसेच केंद्राच्या कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा केली. एरिन वेल्डन आणि चार्ल्स बॅरन यांनी उपस्थितांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. प्रत्यक्ष भेटीनंतर संमेलनाच्या व्यवस्थेच्या आखणीला योग्य दिशा मिळाली आहे.

**संकेत स्थळाचे अनावरण**: दिनांक १५ जून रोजी अधिवेशनाच्या संकेतस्थळाचे अधिकृत अनावरण झाले. अभिजीत मराठे, प्रसाद केसकर आणि त्यांच्या चमूने अधिवेशनाच्या “काय बे” संकल्पनेनुसार आधुनिक आणि आकर्षक संकेतस्थळ तयार केले आहे. https://bmm2024.org/ या अधिवेशनाच्या संकेतस्थळाला आपण जरूर भेट द्या. या संकेतस्थळावर आपल्याला विविध समितींच्या सभासदांची माहिती मिळेल आणि त्यांच्या कार्याचा आढावा घेता येईल. एकेक पान सजत आहे आणि संकेतस्थळावर जोडले जात आहे.

**घोषवाक्याच्या विजेत्यांची घोषणा**: मागील महिन्यात संमेलनाच्या घोषवाक्याच्या स्पर्धेची घोषणा करण्यात आली होती. त्या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. एकूण ४१ जणांनी स्पर्धेत भाग घेतला. तेजस पाटील, माधव देशपांडे, ऋता वाखारकार आणि वर्षा पेंडसे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**विजेते घोषवाक्य आहे: “नवी अस्मिता, नवी भरारी”**
प्रेषक: अनिता म. कांत

**दुसऱ्या क्रमांकावर आहे: “उत्सव संस्कृतीचा, जल्लोष प्रगतीचा!”**
प्रेषक: प्रसाद केसकर




http://www.bmmapp.org/ https://bmmshala.net http://bmm2.page.link/uttarrang

## संस्कृत देववाणी वर्ग

दिनांक १ एप्रिल २०२३ रोजी BMM आणि Bhandarkar Oriental Research Institute (BORI), Pune यांच्या संयुक्त विद्यमाने BMM संस्कृत देववाणी वर्ग – १ ची सुरुवात झाली. हा आठवड्यातून एक दिवस online माध्यमातून चालणारा वर्ग आहे. ९ विद्यार्थ्यांनी चालू झालेल्या ह्या वर्गात आता १२ विद्यार्थी आहेत. सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांचा ह्यात समावेश असून १० वर्षीय बालिका त्यातील सर्वात चिमुरडी विद्यार्थिनी आहे. टोरोंटोस्थित, संस्कृत भाषेच्या अभ्यासू व शिक्षिका, श्रीमती. शुभदा वकनळ्ळी ह्या वर्गाच्या शिक्षिका आहेत.

या वर्गाचा अभ्यासक्रम, परीक्षा व प्रमाणपत्र BORI च्या संयोजनाने असून त्याच्या आधारे ह्या वर्गाची संरचना केली गेली आहे. अभ्यासक्रमाचा कालखंड ३ महिन्याचा असून त्यात basics of Sanskrit language शिकवले जाते आणि त्याचा पुरेपूर अभ्यास करून घेतला जातो. १५ जुलैच्या च्या आसपास BORI द्वारा परीक्षा घेतल्या जातील व त्यानंतर प्रमाणपत्रे दिली जातील.

## मैत्रेयी

"मैत्रेयी" - A Women Empowerment Initiative या उपक्रमाची सुरुवात आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने ८ मार्च २०२३ ला झाली. हा उपक्रम "BMM2.0 Community Outreach" ह्या सदराखाली चालावला जात आहे. ह्या उपक्रमाअंतर्गत BMM व संलग्न मराठी मंडळांच्या महिला सदस्यांना सक्षमीकरण व चांगल्या स्वास्थ्यासाठी विविध प्रकारचे मार्गदर्शन व साधने उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य आहे. श्रीप्रिया राव भोसेकर ह्या प्रमुख Volunteer असून BMM कार्यकारिणी व प्रसाद पानवळकर ह्यांच्या मार्गदर्शन खाली हा उपक्रम राबवला जात आहे.

"मैत्रेयी" उपक्रमाच्या पहिल्या सेशनसाठी ऑस्टिन येथील भक्ती सानप यांनी १५ एप्रिल रोजी लीडरशिप या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले. त्या IT क्षेत्रात उच्च पदावर आहेत.

तसेच दुसऱ्या सेशन साठी मातृदिनानिमित्त १४ मे रोजी महाराष्ट्र मंडळ ऑफ लॉस अँजेलिसच्या अध्यक्षा शिल्पा देसाई यांच्या सेशनचे होस्टिंग रसिका नेरकर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे फ्लायर व लोगो बनवण्यासाठी मौसमी चव्हाण यांनी मदत केली.

BMM कार्यकारिणी सदस्यांचे प्रोत्साहन व मदत ह्या उपक्रमाला कायम मिळत आहे. मोठ्या प्रमाणात हा उपक्रम जॉईन करून सर्वांनी आपल्या community outreach उपक्रमास मदत करावी असे निवेदन आम्ही करत आहोत.

या उपक्रमामध्ये volunteer म्हणून सहभागी व्हायचे असल्यास खालील फॉर्म भरावा:
https://bmm2.page.link/women-empowerment

For more details, please reach out to:
Prasad.Panwalker@bmmonline.org
Sripriya.Bhosekar@bmmonline.org

## बृहन महाराष्ट्र मंडळ फिल्म क्लब

उत्तर अमेरिकेतील मराठी लोकांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देणे व त्याद्वारे एकत्रित आणणे ह्या आपल्या बीएमएम २.० संकल्पनेवर आधारित, *बृहन महाराष्ट्र मंडळ फिल्म क्लब* हा प्रकल्प सुरू करत आहे!

बीएमएम फिल्म क्लब म्हणजे नक्की काय - तर उत्तर अमेरिकेमधील या क्षेत्रातील लेखक, कलाकार, दिग्दर्शक, निर्माते, इत्यादी असे विविध नामांकित तसेच होतकरू मराठी एकत्र येऊन काही आपले असे निर्माण करण्यासाठीचे व्यासपीठ. यासाठी प्रख्यात लोकाच्या कार्यशाळा/सत्रे देखील नियमितपणे आयोजित केली जातील.

उत्तर अमेरिकेतील नामांकितांपैकी एक मोठे नाव म्हणजे "स्वर्णकमळ पुरस्कार" विजेते अभिजित घोलप - देऊळ या चित्रपटाचे निर्माते - या प्रकल्पाचे प्रमुख कार्यकर्ते राहणार आहेत! या प्रकल्पात भाग घेण्यास इच्छुकांनी लवकरात लवकर इथे नाव नोंदणी करावी: https://bmm2.page.link/film-club

हा उपक्रम आपण उत्तर अमेरिका प्रोग्रामिंग या प्रमुख प्रकल्पाखाली राबवला जाणार आहे आणि यावर्षीच दोन शॉर्ट फिल्म काढायचे आपले ध्येय आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क साधा:
अभि घोलप abhi.gholap@bmmonline.org
आणि
अध्यक्ष संदीप दीक्षित Sandeep.dixit@bmmonline.org

## रेशीमगाठी वधू वर मेळावा




यंदा कर्तव्य आहे? तर मग हे जरूर वाचा.

खुशखबर.....!

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात हे खरं ,पण त्या इथे शोधून देते "रेशीमगाठी". उपवर मुलामुलींना प्रत्यक्ष भेटण्यासाठी आता BMM convention पर्यंत थांबण्याची गरज नाही ! आम्हाला कळवण्यास अत्यंत आनंद होत आहे की उपवर वधू वरांसाठी BMM “रेशीमगाठी” आयोजित करत आहे "वधू वर मेळावा".

- प्रवेश शुल्क:
    - रेशीमगाठीचे सभासद असलेल्यांसाठी: $१००
    - रेशीमगाठीचे सभासद नसलेल्यांसाठी: $१२५
- मेळावा फक्त मुलामुलींसाठी आहे याची पालकांनी कृपया नोंद घ्यावी.
- 'रेशीमगाठी' हा बृहन् महाराष्ट्र मंडळाचा एक खास प्रकल्प. या प्रकल्पाचे पुढचे पाऊल म्हणजेच हा स्थानिक मेळावा ज्यात मुलामुलींना प्रत्यक्ष भेटता येईल, एकमेकांविषयी अधिक जाणून घेता येईल.

त्वरा करा आणि आजच रजिस्ट्रेशन करा.
अधिक माहितीसाठी कृपया खालील लिंक पहा.
https://reshimgathee.bmmonline.org/index.php

**Day & Date**: Saturday, July 15 2023
**Narmada Winery,**
43 Narmada Ln, Amissville, VA 20106
**Time**: 2pm to 9pm
**Programs**:

- Mixer & Ice Breakers
- Speed Dating
- Dinner
- Music & Dancing

**Please register ASAP**

**Registration link**:
https://bmm2.page.link/reshimgathee-meet-up-registration

## अंतरंग

हे तिने दैवी लिपीत कोरले जे
ते ऋतूंनी वाचले गूपीत होते

सांगु काळोखास कैसे पाहिले ते
सर्व देखीले कसे रंगीत होते

वाटले ते बासरीचे सूर होते
आईने जे गायलेले गीत होते

तोडगा कोणीच रे शोधीत न्होते
भांडणारे सर्व ते घाईत होते

तीज पाहूनी लपे वेडे पहा ते
पाहताची सावली जे भीत होते

लोक तेथे चालणारे थोर होते
पावलांचे ते ठसे मातीत होते

**- शशांक**

- राशिभविष्य: जूलै २०२३
दादा दामले (न्यू जर्सी )
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## वारसा - "कथा अग्रणींच्या"

**बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन प्रकल्प "वारसा", Youtube मालिका**

आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळे रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून, ते जतन केलं पाहिजे. अश्या गोष्टी एकत्रित केल्या की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे "वारसा" हा प्रकल्प.

**वारसा मालिका, भाग सातवा**
**"कथा अग्रणींच्या"**
**तुळशीबाग ते Fifth Avenue**
**श्री. दुर्गाताई पाच्छापुरकर, कॅनडात स्थलांतर १९६०**



वयाच्या अठराव्या वर्षी तुळशी बागेत खरेदी करणारी पुण्याची दुर्गा अचानक लग्न होऊन न्यूयॉर्कच्या Fifth Avenue मधे थंडीसाठी कोट घ्यायला जाते आणि तिच्या उत्तर अमेरिकेतील आयुष्याला सुरवात होते. तिचे पती गोविंदराव १९५१ मध्येच मालवाहू जहाजावरून न्यूयॉर्कला येऊन टोरांटो, कॅनडा येथे स्थायिक झालेले असतात. दुर्गा टोरांटोत आपलं घर बसवते. आपल्या नंतर आलेल्या तरुण मुलींची ताई बनून वेळोवेळी मदत करते. मराठी लोकांबरोबर गणपती बसवते. मराठी मंडळाची अध्यक्षा आणि "एकता" मासिकाची उपसंपादिका ही होते, आणि मग दुर्गाची दुर्गाताई होऊन टोरांटोच्या मराठी समाजाचा एक अविभाज्य भाग होऊन जाते.

त्यांच्या ह्या प्रवासात येतात ती ह्या दूरच्या अनोळखी देशात आलेली इतर धाडशी आणि कर्तबगार मराठी कुटूंबे. १९४४ पासून अमेरिकेत स्थलांतर झालेले श्री. टाटा आणि त्यांच्या पत्नी शांताताई, लग्न विधींपासून ते भूतं घालवण्यापर्यंतच्या, सर्व प्रकारच्या धार्मिक संस्कारांचे पौरोहित्य करणारे श्री. नाना पटवर्धन आणि त्यांच्या पत्नी ताराबाई, ब्रिटिशांपासून पळून आलेले राष्ट्रप्रेमी आणि समाज सुधारक श्री. मराठे आणि उत्तर अमेरिकेतील मराठी लेखकांना व्यासपीठ देणाऱ्या "एकता" चे संपादक श्री. विनायक गोखले. दुर्गाताई पाच्छापुरकर त्यांच्या रसाळ भाषेत ह्या सर्व अग्रणी व्यक्तींची आपल्याला ओळख करून देत आहेत ह्या वारसाच्या भागात "**कथा अग्रणींच्या , तुळशी बाग ते Fifth Avenue**".

वारसा मालिकेचा हा अनोखा भाग (#७) **"कथा अग्रणींच्या, तुळशी बाग ते Fifth Avenue"** पहाण्यासाठी खालील लिंक क्लिक करा किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा.

ह्या Youtube channel ला जरून like आणि subscribe करा.
BMM VARASA - pisode 7 तुळशीबाग ते Fifth Avenue

Past Episodes:
https://www.youtube.com/@bmm-varasa

## नियम व अटी लागू

नवंकोरं धम्माल विनोदी नाटक!
बघायला यायचं हा नियम आणि हसायचं ही अट!
खालील तारखा विसरू नका!



## सावलीचं झाड

**विद्यार्थी सहाय्यक समिती, पुणे** गेली ६७ वर्षे ग्रामीण भागातून



बारावीनंतर उच्च शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या गरीब आणि होतकरू मुलांना अल्पदरात निवास, भोजनाची सोय करते. तसेच त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रम राबवते. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा ही समितीची त्रिसूत्री आहे. सध्या समितीत ७५० विद्यार्थ्यांची ( ४३० मुले, ३२० मुली) व्यवस्था आहे. सकाळी अर्धा तास योगासने, रोज अर्धा तास संस्थेसाठी श्रमदान, कमवा व शिका योजनेत सहभाग, पाल्य पालक योजनेअंतर्गत महिन्यातून एकदा देणगीदार पालकांची भेट अशी दैनंदिनी असते. ती पाळणारे विद्यार्थीच पुढे प्रवेशासाठी पात्र ठरतात. त्यांच्या कामाचे दरमहा अवलोकन केले जाते.

समितीच्या कार्याची सुरुवात डॉ. अच्युत शंकर आपटे या दूरदृष्टी असलेल्या गणितज्ज्ञाने केली. समाजातील काही द्रष्ट्या लोकांच्या सहकार्याने वसतिगृहांच्या उभारणीला सुरूवात केली. यामध्ये अनेक समविचारी लोक पुढे आले. सर्वांच्या मदतीतून हे काम सुरू झाले. समितीत विद्यार्थी व्यवस्थापन आहे. विद्यार्थी प्रमुख, योगा प्रमुख, भोजनालय प्रमुख अशा जबाबदाऱ्या मुलांना वाटल्या जातात. विदयार्थ्यांच्या कामाची नोंद दरमहा श्रेणी देऊन ठेवली जाते. इथे प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना ५० टक्के फी आकारली जाते. ५० टक्के खर्च समिती देणगीदारांच्या मदतीतून पूर्ण करते. विद्यार्थी आपल्या फीसाठी, शैक्षणिक खर्चासाठी कमवा शिका मधून पैसे मिळवू शकतात. पिढ्यानपिढ्या आर्थिक मदत करणारे अनेक दानशूर या कार्याशी जोडलेले आहेत. समिती सार्वजनिक विश्वस्त म्हणून नोंदलेली धर्मदाय संस्था आहे. आयकर खात्याच्या नियमानुसार मिळणाऱ्या देणग्या ८० जी नुसार कर सवलतीस पात्र आहेत. एफसीआरए अंतर्गतही समितीची नोंदणी आहे.

विद्यार्थी विकास हा समितीच्या कामाचा मुख्य गाभा आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रंथालय, आरोग्य तपासणी, संगणक शिक्षण अशा सुविधा उपलब्ध आहेत. यात स्वतःची ओळख ते मुलाखतीचे तंत्र अवगत होण्यासाठी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. फाउंडेशन कोर्स, स्पोकन इंग्लिश, नाट्य, संगीत यातून अंगभूत कौशल्यांचे विकसन करण्याचा प्रयत्न केला जातो. आता उद्योजकता विकास अंतर्गत संपूर्ण प्रशिक्षण देण्याचा विचार आहे. गर्जे मराठी ग्लोबल या संस्थेशी याबाबत सामंजस्य करारही झाला आहे. यातून एकलव्यसारखे उद्योजकतेला प्रेरणा देणारे उपक्रम सुरू आहेत. भारताबाहेरही आता मित्र ही संकल्पना राबवायला सुरुवात केली आहे. त्यामुळे मुलांची विश्वबंधुत्वाची भावना वाढीला लागायला निश्चितच सुरुवात झाली आहे.

पुण्याकडे येणाऱ्या मुलींची संख्या हल्ली वाढत आहे. त्यांना प्रोत्साहन देण्याची पालकांची भूमिका हे सकारात्मक चित्र आहे. परंतु परवडणाऱ्या खर्चात आणि सुरक्षितता म्हणून समितीकडे येण्याचा कल वाढत आहे. म्हणून पुण्यात अजून एक मुलींसाठी वसतिगृह आणि अहमदनगर येथे मुलींसाठी एक व मुलांसाठी एक अशी तीन वसतिगृहे उभी राहत आहेत. त्यातून ५०० विद्यार्थ्यांची सोय वाढेल.



हजारो मुलांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारी समिती आता सर्वांसाठी सावलीचे झाड झालेली आहे. हे कार्य पाहायला आपण पुण्यात याल तेव्हा निश्चित वेळ काढावा, अशी समिती परिवाराची इच्छा आणि विनंती आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क** – ११८२/ १/ ४, शिवाजीनगर, फर्ग्युसन रस्ता, पुणे- ४११००५, **वेबसाइट** – www.samiti.org **मेल** – mt@samiti.org **मोबाइल क्र**. 94048 55530.

## मराठी भाषिक मंडळ टोरोंटो, कॅनडा

६ मे २०२३ रोजी टोरोंटो येथील मायकेल पावर स्कूलच्या सभागृहात मराठी भाषिक मंडळ,टोरोंटोचा वासंतिक कला महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा झाला. गायन, नृत्य, अभिनय, चित्रकला, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा अशा विविध स्पर्धा वेगवेगळ्या वयोगटांसाठी घेण्यात आल्या आणि त्यात सभासदांनी बहुसंख्येने भाग घेतला. स्पर्धांचे काही निकाल ताबडतोब तर काही कालांतराने जाहीर करण्यात आले. विजेत्यांना ट्रॉफीज आणि इतर सहभागींना Counsel General श्रीमती अपूर्वा श्रीवास्तव यांच्या हस्ते पदके देण्यात आली.

कला महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सादर केले गेलेले संस्कृत नाटक. टोरोंटो मधली ११ ते १५ ह्या वयोगटातील १० मुलांनी ८-९ महिने संस्कृत शिकून नियमित तालीम करून सप्तमः कुत्र गतः..? ही प्रहसनात्मक संस्कृत नाटिका सादर केली. नाटकाच्या लेखिका-दिग्दर्शिका आहेत शुभदा वकनळ्ळी. अशा प्रकारचं संस्कृत नाटक - हा एक अभिनव प्रयोग होता आणि तो सर्वांचे कौतुक आणि शाबासकीची थाप मिळवून गेला.

BMM Outdoors च्या उपक्रमात MBM टोरोंटोच्या ४० सभासदांचे (MBM Walkathon, Mississauga Half Marathon) मिळून **451 Kms running / walking** नोंदले गेले.
MBM Toronto has launched a Youth Leadership Program to enhance leadership skills amongst youth. In the informative YouTube series launched by MBM called 'संवाद', different topics are discussed for the benefit of the community. Canadian Tax was one of the most recent topics.

- शुभदा वकनळ्ळी

# शिवाजी पार्कची फेरी -२०२३

आम्ही अमेरिकेच्या उत्तर-पूर्व भागात राहतो. इथे हिंवाळ्यात तीव्र थंडी आणि प्रचंड हिमवर्षाव होत असतो. त्याच्या पासून बचावासाठी आमच्यासारखे वयस्क, जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात गरम प्रदेशातील फ्लॉरिडा किंवा अरिझोना राज्यात पलायन करतात, परंतु आम्ही त्या काळात भारतात मुंबईला जाणे पसंत करतो. एक तर, त्याकाळात तिथली हवा आल्हाददायक असते. दुसरे, आम्ही दोघे मुंबईच्या ज्या भागात - शिवाजी पार्कात - वाढलो तिथे राहणे पसंत करतो. नशिबाने ह्या वर्षी आम्हाला शिवाजी पार्क भागात दोन महिन्यासाठी एक फ्लॅट भाड्याने मिळाला. त्या कारणाने मला सकाळ-संध्याकाळ शिवाजी पार्कला फेऱ्या मारता आल्या.

सन १९६६ साली मी अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी आलो. त्यानंतरच्या प्रत्येक भारत-भेटीत मी शिवाजी पार्कला सकाळ - संध्याकाळ फेरी मारत असे. त्यासंबधीचा 'शिवाजी पार्कची प्रभातफेरी' हा १९९९ सालचा लेख माझ्या "सेतू" (मातृभूमी सेवाट्रस्ट, मुंबई, २००३) ह्या पुस्तकात समाविष्ट केला होता. २४ वर्षा नंतरच्या ह्या खेपेच्या फेरीमधील काही ठळक अनुभव माझ्या लेखात नमूद करावेसे वाटतात.

आजही सकाळच्या वेळी शिवाजी पार्क जिमखाना व प्राथमिक बालमोहन शाळा दरम्यान निरनिराळ्या प्रकारचे रस व अर्क (सर्व व्याधीवर रामबाण उपाय असा विक्रेत्यांचा आजही दावा!) विकण्यासाठी विक्रेते बसलेले आढळले. मात्र या खेपेस माई मंगेशकर बागेशेजारच्या खुल्या व्यायाम शाळेसमोर (Open Gym) एकजण निरनिराळे टी शर्ट विकण्यासाठी कट्ट्यावर बसलेला दिसला. तसेच, पूर्वी जिथे हास्य क्लब भरत असे, त्या जागी आता आजी आजोबा (नाना-नानी) पार्क झालेले आहे. त्याच्या समोरच्या कट्ट्यावर तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या विकणारी एक बाईही आढळली. नाहीतरी, लोक फिरून झाल्यावर जवळच्या मार्केट मध्ये भाजी आणायला जायचे. त्यांच्या सोयीसाठी भाजीपालाही आता कट्ट्यावर येऊ लागला असे वाटते! शिवाजी पार्क भोवती फेऱ्या मारून तुमचे पाय दुखायला लागले तर पायाच्या मालिशसाठी (Foot Massage) दोन ठिकाणी सोय आढळली - एक, शिवाजी पार्क जिमखाना जवळ तर दुसरे, वीर सावरकर मार्गावरील दादर नागरिक संघाच्या बाजूला.

मुंबई मॅरेथॉन २१ जानेवारीला पार पडली. त्यावेळेस पार्कच्या पश्चिमेकडील वीर सावरकर मार्ग वाहनांसाठी बंद होता. तसेच २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनानिमित्तच्या परेडसाठी पार्कच्या आत, त्याआधी बरेच दिवस, सराव (परेडसाठी) चालत असे. परंतु, पार्क भोवतालच्या कट्ट्याच्या आत व बाहेरील चालण्याच्या मार्गावर मुळीच प्रतिबंध नव्हता !

व्हॅलेंटाईन सप्ताहाच्या प्रथम दिवशी (ह्या वर्षी ७ फेब्रुवारीला ) काही लोक Rose Day म्हणून पाळतात. त्यादिवशी सकाळी, मीनाताई ठाकरे पुतळ्याजवळ, काही तरुणांनी माझ्या हातात एक गुलाबाचे फूल देऊन मला सांगितले कि तुम्हांला एखादा पोलीस (आमच्या काळातील सखाराम!) दिसला, तर त्याला ते फूल देणे! मी शिवाजी पार्क जिमखाना, समर्थ व्यायाम मंदिर, गणेश उद्यान मंदिरावरून स्काऊट हॉलला वळसा घालून शिवाजी पार्कच्या ईशान्येकडील (North-East) प्रवेशद्वाराजवळ आलो. तो पर्यंत मला एकही खाकी वर्दीवाला दिसला नाही. फ्लॅटवर परत जाण्यासाठी तिथून बढे चौक (हरी निवास) दिशेने मी चालू लागलो. त्या रस्त्यावर काही सफाई कामगार तिथला पदपथ व रस्ता साफ करताना दिसले. त्याबरोबर माझ्या मनात विचार आला, की ह्या कामगारांच्या कामाचे कौतुक करणेही जरुरीचे आहे. त्या सर्वांना एकत्र करून, त्यांच्या स्वच्छता कामाबद्दल आभार मानून, मी त्याना ते गुलाबाचे फूल दिले. माझे हे कृत्य त्यांना आवडले व त्यांनी माझ्यासोबत एक फोटोही काढला!

१४ फेब्रुवारी - Valentine's Day -ला व नंतरच्या आठवड्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसेचे) एक नेते, संदीप देशपांडे ह्यांच्या संकल्पनेतून माई मंगेशकर बागेबाहेर एक "सेल्फी पॉइंट" ठेवण्यात आला होता. त्या ठिकाणी, रात्रीच्या वेळी, दिव्यांची आरास करून "वैभवशाली दादर" व, "I Love Dadar" अशा प्रकारची पोस्टर सुशोभित करण्यात आली होती. दर संध्याकाळी त्या ठिकाणी फोटो घेण्यासाठी गर्दी जमत असे, तर शनिवार व रविवार संध्याकाळी, लोकांची तोबा गर्दी होत असे.

सकाळच्या वेळी फिरायला जात होतो त्यावेळी शिवाजी पार्क जिमखान्यासमोरील कट्ट्यावर बसलेली एक वयस्क स्त्री आणि तिच्या भोवती काही तरुणांचा घोळका अनेक दिवस आढळून आला. गेली अनेक वर्षे ह्या दृश्याने माझे कुतूहल वाढले. शेवटी ह्या ट्रिप मध्ये त्या व्यक्तीची ओळख करून घ्यायचे ठरवले. तिने तिचे नाव ज्योत्स्ना संझगिरी असे सांगितले. अधिक चौकशी करता, ती माझ्याप्रमाणेच बालमोहनची माजी विद्यार्थी निघाली, परंतु माझ्यापेक्षा वयाने लहान. तिच्या भोवतालचे तरुण तिला 'मावशी' म्हणून संबोधत होते. अमेरिकेत परत आल्यावर माझे न्यूयॉर्क शहरातील मित्र - जयंत कुळकर्णी (त्यांना शिवाजी पार्क विषयी प्रचंड माहिती आहे) ह्यांनी तिच्यासंबधी अधिक माहिती पुरवली. ही मावशी मुंबई मॅरेथॉनच्या दिवशी वीर सावरकर मार्गावरील जुन्या महापौर बंगल्यासमोर, तिथून धावत जाणाऱ्या स्पर्धकांना काही स्वयंसेवकांच्या मदतीने, पाणी पुरवत असते. स्वतःच्या अंध व्हायोलिनवादक धाकट्या भावाची काळजी घेण्यासाठी ही मावशी अविवाहित राहिली !

दिवसेंदिवस वयोमानानुसार माझे चालणेही संथ (पूर्वीच्या गतीच्या मानाने) होत चालले आहे. त्यातून शिवाजी पार्कला जाणाऱ्या वाटेत पदपथ व रस्ते खणून ठेवलेले असतात. ते ठेवले नसतील तर, छोटे विक्रेते आपली टपरी पदपथावर थाटून सरळ आक्रमण करतात. त्यामुळे पार्कपर्यंत जाताना ही अडथळ्याची शर्यत किंवा आट्यापाट्या (अमेरिकीतील फुटबॉल) खेळत जावे लागते. वाटेत पडून हाडे मोडणार नाहीत ह्याची सतत काळजी घ्यावी लागते,

सुखरूप परत आपल्या घरी जाण्यासाठी! मात्र, एकदा शिवाजी पार्कला पोहचल्यावर तिथल्या कट्ट्याच्या आत आणि बाहेरच्या बाजूला असलेल्या पायवाटेवरून चालणे सोपे जाते. अगदी एखादा किल्ला चढून माथ्यावर गेल्याचा आनंद मिळतो!

माझ्या कॉलेज काळात १९४४ मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे केंद्र म्हणून इथे अनेक सभा होत असत. बहुतेक सभांना मी हजर असे. त्यातील एका सभेत आचार्य अत्र्यांनी शिवाजी पार्कचा उल्लेख "शिवतीर्थ" असा केल्याचे आठवते. प्रत्येक भारतभेटीत शिवतीर्थाभोवती अनेक फेऱ्या होत असतात. भविष्यात, भारतभेट करता आली नाही तर, त्याच्याभोवती मनातल्या मनात प्रदक्षिणा घातल्याशिवाय मला चैन पडणार नाही!

- सुधीर शं. कुलकर्णी

## ब्राह्मणसभा, मुंबई

अमेरिकेतील तमाम मराठी बंधु भगिनीना सप्रेम नमस्कार .....

मी दिलीप शेवडे ( वय वर्षे ७५ ). एक वरिष्ठ विश्वस्त या नात्याने, या लेखाद्वारे, मी आपल्या सर्व वाचकांना गेली १३५ वर्षे सातत्याने व निरलस पणे समाज सेवा करणाऱ्या एका समाजसेवी संस्थेच्या कार्याची ओळख व माहिती करुन देऊ इच्छीतो. या संस्थेचे नांव आहे ब्राह्मणसभा, मुंबई.

या संस्थेची स्थापना महत् गुरु शंकराचार्यांच्या प्रेरणेमुळे सन १८८८ साली गिरगांव, मुंबई येथे झाली आणि तेव्हापासून ही संस्था आरोग्य, शिक्षण, सामाजिक/ धार्मिक, सांस्कृतिक इत्यादि क्षेत्रांमधे पुढील शाखांच्या मार्फत गेली १३५ वर्षे अविरत कार्य करीत आहे.

१. आरोग्य - Integrated complex of a Maternity Hospital & a Nursing Home with 2 operation Theaters & major diagnostic facility, साळवेकर व्यायामशाळा.
२. विद्यार्थी शाखा - गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत आणि शिष्यवृत्या आणि परदेशी शिक्षणासाठी विनाव्याज कर्ज, Reading & circulating Library
३. महिला शाखा - महिलांसाठी शिक्षण, स्पर्धा, सर्व सण साजरे करणं
४. सांस्कृतिक शाखा - गेली १०५ वर्षे सार्वजनिक गणेशोत्सव ज्यात प्रसिध्द कलाकारांचे गाण्याचे व विचारवंतांची भाषणे, विविध स्पर्धांचे आयोजन' जवळ जवळ २५ संस्कृत नाटकांचे पुनर्जीवन व सादरीकरण, वाचन कट्टा
५. धार्मिक - हिंदुंचे सर्व सण साजरे करणे
६. दक्षिण मुंबईत स्मशानभूमित स्वत:ची धर्मशाळा

आणि आमच्या संस्थेच्या नावावरुन कृपया गैरसमज करुन घेऊ नका कारण ब्राह्मण सभा ही ब्राह्मणांची संस्था असली तरी आमच्या बहुतेक सर्व सेवा/सुविधा ह्या सर्व जाती, जमाती आणि धर्मियांसाठी at most affordable costs उपलब्ध आहेत.

तुम्ही सर्वानी सातासमुद्रा पलीकडे जाऊन, फार परिश्रम घेऊन, यशस्वी होऊन आपल्या देशाचे व महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे याचा आम्हां सर्वांना अभिमान आहेच, पण एक सामाजिक बांधिलकी म्हणून आपण आमच्या संस्थेला काही आर्थिक मदत करावी असं माझ विनम्र आवाहन व विनंती आहे.

तुम्हाला आमच्या संस्थेला मदत करण्याची इच्छा असेल तर Dileep Shevde (WhatsApp/call + 91 9820305498 or E mail: shevdedileep@gmail.com) वर संपर्क साधु शकता. BMM, North America चे सध्याचे अध्यक्ष श्री संदीप दीक्षित व दुसरे / जुने कार्यकर्ते श्री मोहन रानडे यांचे आम्हांला फार छान मार्गदर्शन व मदत लाभत आहे यासाठी आम्ही त्यांचे ऋणी आहोत. धन्यवाद!

- दिलीप शेवडे

## उंच माझी झेप!

नुकत्याच ग्रॅज्युएट झालेल्या सर्व विद्यार्थांसाठी ही खास कविता! त्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या भावना व्यक्त करण्याचा छोटासा प्रयत्न केलेला आहे. ही सर्व मंडळी आपापली उबदार घरटी सोडून नवीन आणि मोठ्या महाविद्यालीन शिक्षणासाठी इतर शहरात/ राज्यात लवकरच प्रयाण करणार आहेत. त्या सर्वांचे खूप खूप अभिनंदन, खूप खूप शुभेच्छा!

एक पिल्लू उडू बघतंय आकाशाशी बोलू पाहतंय
तारे वारे सारे काही अंगावरती झेलू म्हणतंय

पंखांमध्ये बळ येतंय सराव करून स्वैर होतंय
पहिले पाऊल पुढे टाकण्या मन धजु पुढे येतंय

धाडस करण्या मन सरलंय नजरेमध्ये स्वप्न भरलंय
अनंताच्या छायेखाली उड्डाणाचं गुपित लपलंय

चालीमध्ये डौल दिसतोय कणा ताठ होऊ पाहतोय
डोळ्यांच्या कडांमधून मोर मनी नाचू पाहतोय

आव्हानाचा डोंगर पुसतोय तयारीचा कस बघतोय
विश्वासाचा सूर लागो ताकदींशी लढ म्हणतोय

जुनं काही आठवतंय? खूप काही शिकवलंय
आठवणींच चांदणं अंबरभर पांघरलंय

एक पाऊल अडखळतंय घरट्यामध्ये डोकावतंय
शाश्वताचा एक हात सोबत येऊ, विचारतोय?

स्वप्न मोठ्ठं साकारतंय आता नाही थांबायचंय
मोठी येवो आव्हाने ध्येयासाठी वेडं व्हायचंय!
ध्येयासाठी वेडं व्हायचंय!

- प्रिया गोडबोले


Atharv
Redefining Vile Parle
A 5 TOWER EXCELLENCY
A key to Lifestyle
UPPER VILE PARLE
COMING SOON
Atharv Rosewood 2014
Atharv Shagun 2016
MAHA RERA
Atharv Palace 2018
MAHA RERA
Atharv Pride 2019
MAHA RERA
Atharv Saraswati 2020
MAHA RERA
Atharv Navasamaj 2021
MAHA RERA
Atharv Murli 2021
MAHA RERA
Atharv Heights 2021
MAHA RERA
Atharv Laxmi 2022
MAHA RERA
Mob.: +91 77388 66111
www.atharvlifestyle.com | sales@atharvlifestyle.com

## NAMASKAR

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**

बृहन्महाराष्ट्र मंडळ



**नाते जुळते मनाशी मनाचे**




*Reshimgathee*

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/

## कारगाथा - भाग ३ - निक् द ग्रीक

(*या लेखाचे पहिले दोन भाग मार्च २०२३ आणि मे २०२३ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहेत.*)

रॉडचे घर दूर होते म्हणून मला लवकरच दुसऱ्या कोणाला तरी शोधायला लागणार होते. ड्रायव्हिंग टेस्टला बरेच दिवस होते. तिथे वेटिंग लिस्ट होती. माझी लोकलच्या कॉलफील्ड स्टेशनवर निक् नावाच्या एका ग्रीक माणसाबरोबर ओळख झाली होती. मेलबर्नमध्ये इतके ग्रीक लोक होते, की ग्रीसच्या बाहेर सगळ्यात जास्त ग्रीक लोक असलेले अशी मेलबर्नची ख्याती होती. निक् काही माझ्या कल्पनेतला ग्रीक अडॉनिस नव्हता - तो एक बुटकासा मध्यमवयीन लहान चणीचा माणूस होता! तो पण निस्सान मोटर कंपनीत कामाला होता. त्याचे घर स्टेशनच्या पलीकडे होते आणि माझे अलीकडे, म्हणजे आमच्या घरात फारसे अंतर नव्हते. मी त्याला सांगितले, "मी रोज सकाळी तुला तुझ्या घरून गाडीतून घेऊन जाईन आणि संध्याकाळी परत घेऊन येईन. तुला लोकलचा पास काढायला लागणार नाही आणि माझीही सोय होईल". तो आनंदाने तयार झाला. आता फक्त इतकीच भीती होती, की त्याच्या आणि माझ्या घरांमधल्या रस्त्यावर जर पोलिसाने थांबवले तर मला 'एल' (लर्नर) बोर्ड नं लावल्यामुळे दंड झाला असता. नशिबाने कधी पोलिसांशी संपर्क आला नाही.

ड्रायव्हिंग टेस्टची मी तयारी सुरू केली. सगळे नियम अगदी तोंडपाठ केले. मला पुण्यात १९८४ साली दिलेली ड्रायव्हिंग टेस्ट अजून आठवत होती. ड्रायव्हिंग स्कूलमधल्या आम्हा चार विद्यार्थ्यांना आमचा शिक्षक घेऊन गेला होता. चौघांपैकी एक मुलगी त्या काळच्या पुण्याच्या पोलीस कमिशनर यांची कन्या होती. आम्हा सगळ्यांना आधी संगमपुलाजवळील प्रादेशिक परिवहन कार्यालयात नेण्यात आले. तिथून मग आम्हाला आणि परीक्षकाला घेऊन दोन गाड्या होटेल ब्लू डायमंडच्या परिसरात गेल्या. तिथे एका मोठ्या वडाच्या झाडाखाली आम्ही थांबलो. एकेकाची परीक्षा सुरू झाली. माझी पाळी आल्यावर मी चालकाच्या खुर्चीत बसले. शिक्षक माझ्याशेजारी बसला आणि परीक्षक मागच्या बाजूला. मी गाडी सुरू केली आणि जरा चालवते आहे तोवर परीक्षक म्हणाला, "गाडी बाजूला घे". गाडी एक मैल सुद्धा न चालवता माझी परीक्षा संपली होती.

आमच्या चौघांपैकी फक्त एक मुलगी पास झाली होती. ती अर्थातच कमिशनरांची कन्या होती! मी शिक्षकाला म्हणाले, "मला का नापास करण्यात आले? मी काही चूक केली नाही. चूक करायला जागाच नव्हती; जागा म्हणण्यापेक्षा वेळच कुठे होता? मी गाडीत अजून बसले नाही तोवर लगेच परीक्षा संपली". शिक्षक म्हणाले, "जाऊ दे. पुढच्या खेपेला तू नक्की पास होशील!" मी स्वतःशीच विचार केला, "ह्याला काय माहित पुढच्या खेपेला मी नक्की पास होईन?" पण जास्त कटकट न करता मी परत परीक्षा दिली आणि ह्या खेपेला मी काय दिवे लावले कोणाला माहीत नसेल पण मी पास झाले. नंतर मला कळले, की सगळ्या ड्रायव्हिंग स्कूलचा एक 'कोटा' असतो. म्हणजे चार पैकी एक किंवा दोनच विद्यार्थी प्रत्येक वेळेला पास होतात. खरेखोटे देवालाच माहीत!

इथे मात्र मी ऐकले होते, की परीक्षेत प्रत्येक नियमाचे पालन होते का नाही हे पाहतात. 'पॅरलल पार्किंग' आणि 'थ्री पॉईंट टर्न' यांची विशेष परीक्षा घेतली जाते. 'थ्री पॉईंट टर्न'चा सराव करणे अगदी सोपे होते - कुठला तरी जास्त रहदारी नसलेला अरुंद रस्ता शोधायचा आणि तीन वळणात 'यू टर्न' करायचा. पण 'पॅरलल पार्किंग'चा सराव करणे इतके सोपे नव्हते. त्यासाठी दोन गाड्या लागतात. पण कोण आपली गाडी असल्या सरावासाठी खुशीने देईल? धक्का लागला तर? ड्रायव्हिंग स्कूलमधे चार फूट उंच खांब वापरतात पण असले खांब आणायचे कुठून? बराच विचार केल्यावर मला एक कल्पना सुचली. मी सरळ एका रोपवाटिकेत गेले आणि दोन कुंड्या आणि रोपांना आधार म्हणून वापरण्यात येणाऱ्या दोन काठ्या खरेदी केल्या. रोपवाटिकेच्या मालकाने विचारले, "रोपं नकोत का?" मग मी त्याला हे सामान मला का हवे होते ते सांगितले. तो खो खो हसला आणि माझे पैसे परत करत म्हणाला, "काम झालं, की हे मला परत कर".

त्याचे आभार मानून मी सरळ माझ्या फ्लॅटजवळच्या एका कमी रहदारी असलेल्या गल्लीत गेले, गाडी लावली, गाडीच्या लांबीवर 'खांब' लावले, आणि 'पॅरलल पार्किंग'चा सराव करू लागले. एकदोनदा गाडी कुंड्यांना घासली, पण गाडीला काही इजा झाली नाही. मी बराच वेळ माझ्याच तंद्रीत अगदी एकलव्यासारखा सराव करत होते आणि ह्या कामात इतकी मग्न झाले होते, की आजूबाजूला काय चालले आहे इकडे माझे लक्ष गेले नाही. तासाभराने मी कंटाळले आणि गाडीची डिकी उघडून सगळं साहित्य आत ठेवू लागले. माझी नजर सहज बाजूला गेली आणि मला एकदम झटकाच बसला. प्रत्येक घराच्या अंगणात एक-दोन मुलं उभी होती आणि एकटक माझ्याकडे पाहत होती. नजरेत 'काय हा बावळटपणा चालला आहे' असे भाव होते. कुणास ठाऊक मी कधीपासून त्यांचे मनोरंजन करत होते!

परीक्षेचा दिवस आला. नियमाप्रमाणे बरोबर कोणी पूर्ण लायसेन्स असलेली व्यक्ती यायला हवी होती. ऑफिसमधले बरेचसे लोक क्रिसमसच्या सुट्टीवर गेले होते. पण जिम् कुठेही जाणार नव्हता. आम्ही दोघं वेळेवर परीक्षा केंद्रावर पोहचलो. बरोबर तीन वाजता माझ्या नावाचा पुकारा करण्यात आला. मी माझ्या गाडीत चालकाच्या खुर्चीत बसले. परीक्षक एक मध्यमवयीन गोरा ऑस्ट्रेलियन होता. तो माझ्याशेजारी पुढे बसला आणि जिम् मागच्या खुर्चीत. मी अगदी काळजीपूर्वक सीट बेल्ट लावला, गाडी सुरू केली, मागे पाहण्याच्या आरशात पाहिलं, आणि परीक्षकाकडे पाहिलं. त्यानं मला गाडी पार्किंगमधून काढायला सांगितली आणि मी उजव्या हाताच्या आरशात पाहून आणि उजवा इंडिकेटर लावून गाडी बाहेर काढली. तो म्हणाला, "आधी 'पॅरलल पार्किंग' करून दाखव". खूप सराव केलेला असल्यामुळे मी ते अगदी लीलया करून

दाखवले आणि उत्सुकतेने त्याच्याकडे पाहू लागले. त्याच्या चेहऱ्यावरची माशी सुद्धा हलली नाही.

मग तो मला सांगेल त्याप्रमाणे गावातून मी गाडी चालवली. शेवटी समोर परीक्षा केंद्र दिसू लागले आणि धरून ठेवलेला श्वास मी सोडला. आतापर्यंत मी एकही चूक केली नव्हती आणि 'दिल्ली अब दूर नाही' असे मला वाटायला लागले होते. समोरचा रस्ता पार केला, की मला मुक्ती मिळणार होती. मी गाडी थांबवली, रस्त्याच्या आधी उजव्या बाजूला पाहिले, मग डाव्या बाजूला आणि पटकन रस्ता पार केला. तेवढ्यात परीक्षक मला म्हणाला, "स्टॉप द कार". मी गाडी रस्त्याच्या बाजूला थांबवली. माझ्या छातीचा भाता उसळी मारून धडधडायला लागला. मी त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागले. तो म्हणाला, "यू डिड अ रोलिंग स्टॉप" आणि गाडीतून उतरून मागच्या खुर्चीत बसता बसता जिमला म्हणाला, "प्लीज टेक ओव्हर". मी हिरमुसले. 'दिल्ली अब दूर नाही'च्या ऐवजी ख्वाजा निजामुद्दीन औलिया सारखे 'हुनुज दिल्ली दूर अस्त' असे म्हणायची वेळ आली. जिम् म्हणाला, "देर इज ऑल्वेज द नेक्स्ट टाइम". पण नेक्स्ट टाइम म्हणजे आणखी तीन महिने!

अखेर तीन महिन्यांनी मी परत एकदा परीक्षा दिली आणि बाजी मारली. आता मला गाडी चालवताना एल-बोर्ड लावायची गरज नव्हती की निकची! पण गरज संपली म्हणून मी निकला सोडून दिलं नाही. आम्ही दोघं निस्सानला एकत्र जात राहिलो. आता मी बिनधास्तपणे कधीही कुठेही येऊ जाऊ लागले. कुणावर अवलंबून राहायची गरज नव्हती. सकाळी थंडीत कुडकुडत स्टेशनवर जायला लागत नव्हतं. गाडीत कॅसेट प्लेयर असल्यामुळे गाडीत बसल्या बसल्या हिंदी गाण्यांना ऊत येऊ लागला. प्रिन्सेस हायवेवरून ऑफिसला जाताना रिमझिम पावसात 'जब चली ठंडी हवा, जब उठी काली घटा, मुझको ऐ जाने वफा, तुम याद आये' हे गाणे गाडीत ऐकताना जी मजा यायची ती आता खूप महागड्या स्टेरिओवरही येत नाही.

सगळे काही नीट चालले होते. जिमनं आणि मी लिहिलेला एक प्रोग्रॅम 'इम्प्लिमेंट' करायचा होता. निस्सान फॅक्टरीमध्ये दिवसाला तीनशे गाड्या असेम्बल केल्या जायच्या. प्रत्येक गाडीत जी व्हिन (व्ही आय एन) - म्हणजे 'वेहिकल आयडेंटिफिकेशन नंबर' प्लेट असते ती एम्बॉस करण्याचे काम आमचा प्रोग्रॅम करणार होता. प्लेटवर इंजिन नंबर आणि व्हिन असतो. असेम्बली लाईनवर गाडी शेवटच्या स्टेशनला आली, की कामगार बारकोड स्कॅनरने गाडीचा तात्पुरता दिलेला नंबर स्कॅन करायचा, मग माझा प्रोग्रॅम डेटाबेसमधून त्या गाडीचा व्हिन आणि इंजिन नंबर शोधून काढायचा आणि कामगाराने एम्बॉसिंग मशीनवर अल्युमिनियमची छोटी प्लेट ठेवली आणि बटण दाबलं, की दोन्ही नंबर प्लेटवर एम्बॉस व्हायचे. तर एका सोमवारी हा प्रोग्रॅम 'लाईव्ह' होणार होता.

फॅक्टरीतली पहिली पाळी सकाळी सहाला सुरू व्हायची. जिम् आणि मी अंधारातच फॅक्टरीत पोचलो. पाऊस पडत होता. वर्कशॉपमध्ये ठिकठिकाणी हीटर टांगलेले होते पण पाचच मिनिटात माझ्या अंगात हुडहुडी भरली. पहिली गाडी शेवटच्या स्टेशनला सहा वाजून दहा मिनिटांनी पोचली. आमच्या मार्गदर्शनाखाली कामगाराने प्लेट एम्बॉस केली. 'राडा' सुपरवायझर होती. भरपूर आत्मविश्वास असलेली, भरदार अंगाची, निळ्या रंगाचा बॉयलर सूट घालून शॉप फ्लोर आपलेच असल्यासारखे इकडे तिकडे फिरणारी राडा मला तर आधी पुरुषच वाटली होती. काम तिच्या पसंतीला उतरले होते.

तासाभराने आम्ही आमच्या ऑफिसमध्ये कॉफी प्यायला गेलो तर राडा धावत आली, "द लाईन हॅज स्टॉप्ड". कॉफी तशीच टाकून आम्ही पळतच शॉपफ्लोरवर गेलो. आमच्यामुळे गाड्यांचं उत्पादन थांबलं असतं, तर बॉसने आमची हजामत केली असती. प्रोग्रॅम तिथेच डी-बग केला आणि लाईन परत सुरू झाली. अशा तऱ्हेनं आम्ही पहिली आणि दुसरी पाळी शॉपफ्लोरवर काढली. शेवटची प्लेट एम्बॉस झाली आणि आम्ही घरी निघालो. जिम् आपल्या गाडीकडे निघून गेला. मी माझ्या गाडीकडे कशीबशी चालत गेले. रात्रीचे आठ वाजले होते. पावसाची रिपरिप चालूच होती आणि थंडी वाढत चालली होती. मी गाडीत बसले आणि घरी जाऊन काय स्वयंपाक करायचा ह्याचा विचार करत गाडीची किल्ली फिरवली. पण इंजिनची घरघर तर सोडाच पण एकही दिवा लागला नाही.

मी बारकाईने तपास केला आणि पाहिलं, की गाडीचे दिवे चालू होते. म्हणजे जवळजवळ चौदा तास दिवे जळत होते आणि त्यामुळे गाडीची बॅटरी पूर्णपणे डिस्चार्ज झाली होती. भूक, थंडी, आणि स्वतःवरचा राग - ह्या गोष्टींमुळे आता रडू येते की काय असे वाटू लागले. पण रडून काय उपयोग? पावसातून परत ऑफिसात गेले आणि आरएसीव्हीला फोन केला. तरी बरे मी त्यांची रोड मेंटेनन्सची फी भरलेली होती. आणि परत पार्किंगच्या मोठ्या पटांगणात गाडीत जाऊन बसले. अर्ध्या तासाने मेकॅनिक् आला आणि त्याने माझी गाडी जंपस्टार्ट केली. कुठेही न थांबता मी घरी गेले आणि गॅरेजमध्ये गाडी लावली. बॅटरी आता चार्ज करायला लागणार होती. मी निकला 'काय करू' म्हणून फोन केला. तो म्हणाला, "माझ्याकडे बॅटरी चार्जर आहे. मी येतो आणि तुझी बॅटरी रात्री चार्ज करायला ठेवतो, सकाळपर्यंत ती चार्ज होईल. उद्या आपण माझ्या बायकोच्या गाडीनं ऑफिसला जाऊ या".

निक् असा खूपदा माझ्या मदतीला आला आणि तो नसला तर रॉड होताच. ही गाडी मी अडीच वर्षे वापरली. एक बॅटरी सोडली तर गाडीत काही खोट नव्हती. मेलबर्न सोडताना साडेचार हजाराची ही गाडी दोन हजारात मी विकली.

- वासंती मुदकण्णा